महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत विविध **अधिकारांचे प्रत्यायोजन (Delegation of Power) करणेबाबत.**

## महाराष्ट्र शासन

शासन परिपत्रक क्रं एमएसआरएलएम २०१२/ प्र.क्र २८१/ योजना -३
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन, २५, तळमजला, मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई-४००००१
दिनांक:१५/१२/२०१२

**वाचा :** १) शासन निर्णय क्र. एनआरएलएम/२०११ /प्र.क्र.१९६/ योजना-३ दिनांक १८ जुलै २०११
२)महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान राज्यस्तरीय सर्वसाधारण अभिकरण समिती सभा दि. २/५/२०१२ इतिवृत्त.

१) केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान (NRLM) च्या अंमलबजावणी करण्याकरिता १८ जुलै २०११ च्या शासन निर्णयान्वये राज्यात महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान सुरु करण्यात आले असून. त्याकरिता राज्यस्तरापासून ग्रामस्तरापर्यंत स्वतंत्र व समर्पित यंत्रणा स्थापन करण्यात येत आहे. सदर योजनेची अंमलबजावणी करण्याकरिता स्वतंत्रपणे अधिकारांचे प्रत्यायोजन होणे आवश्यक असल्याने मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली स्थापित राज्यस्तरीय सर्वसाधारण अभिकरण समितीने उपरोक्त वाचा २ अन्वये योजनेचे धोरण निश्चिती, पथदर्शी आराखडे व विविध नियमावल्या तयार करणे, आर्थिक व प्रशासकीय अधिकार तसेच संपादणूक व खर्च करण्याच्या मर्यादा या प्रकारच्या विविध अधिकारांच्या प्रत्यायोजनास खालीलप्रमाणे मान्यता प्रदान केली आहे.

| अ.क्र | अधिकार | अधिकार प्रत्यायोजन करावयाच्या समिती/अधिकाऱ्याचे नाव | पुष्टीकरण करणारी समिती/ अधिकारी |
|---|---|---|---|
| अ) धोरण व पथदर्शी आराखडे व विविध नियमावल्या | | | |
| १. | राज्य पथदर्शी प्रकल्प अंमलबजावणी आराखडा (SPIP) मान्यता देणे | राज्यस्तरीय सर्वसाधारण सभा (General Body) | ------ |
| २. | विविध शासकीय विभागाशी समन्वय करण्यास मान्यता प्रदान करणे | राज्यस्तरीय सर्वसाधारण सभा (General Body) | ------- |
| ३. | वार्षिक खर्चास मान्यता प्रदान करणे | राज्यस्तरीय सर्वसाधारण सभा (General Body) | ------- |
| ४ | लेखा परिक्षण अहवालास मान्यता प्रदान करणे | राज्यस्तरीय सर्वसाधारण सभा (General Body) | ------- |
| ५ | अभियानाची ध्येय व उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने केंद्र व राज्य शासनाचे विविध विभाग व यंत्रणा तसेच विविध संस्था यांच्या सहभागातून सक्षम प्रशासकीय व्यवस्था निर्माण करणे. (संस्थेची उपविधी कलम १५-ड) | राज्यस्तरीय नियंत्रण समिती | राज्यस्तरीय सर्वसाधारण सभा (General Body) |
| ६ | अभियानचे ध्येय व उद्दिष्ट साध्य | राज्यस्तरीय कार्यकारी समिती | राज्यस्तरीय नियंत्रण समिती |

| | | | |
|---|---|---|---|
| | करण्याच्या दृष्टीने चल अचल मालमत्ता खरेदी, भाडेतत्वावर, करार तत्वावर इत्यादी पध्दतीने संपादीत करणे तसेच मालमत्तेचे बांधकाम, देखभाल व दुरुस्ती करणे (संस्थेचे उपविधी कलम १५ -एच) | | |
| ७ | संस्थेच्या ध्येय धोरणाची सुसंवाद कार्य करणाऱ्या इतर संस्था, विश्वस्थ संस्था इत्यादीकडून अनुदान, आर्थिक सहाय्य, मालमत्ता इत्यादी स्वीकारणे | राज्यस्तरीय कार्यकारी समिती | राज्यस्तरीय नियंत्रण समिती |
| ८ | वित्तीय नियमावली | राज्यस्तरीय कार्यकारी समिती | राज्यस्तरीय नियंत्रण समिती |
| ९ | प्रशासकीय नियमावली | राज्यस्तरीय कार्यकारी समिती | राज्यस्तरीय नियंत्रण समिती |
| १० | मनुष्य संसाधन नियमावली | राज्यस्तरीय कार्यकारी समिती | राज्यस्तरीय नियंत्रण समिती |
| अ) आर्थिक | | | |
| १. | अंदाजपत्रके / राज्य वार्षिक कृती आराखडयास मान्यता देणे | राज्यस्तरीय कार्यकारी समिती | राज्यस्तरीय नियंत्रण समिती |
| २. | जिल्ह्याचे वार्षिक कृती आराखड्यां-ना मान्यता प्रदान करणे | जिल्हास्तरीय नियंत्रण समिती | -- |
| ३. | अंदाजपत्रकानुसार राज्यस्तरावरुन जिल्ह्यांना निधी वितरण | मुख्य कार्यकारी अधिकारी | अभियान महासंचालक |
| ४. | अंदाजपत्रकानुसार जिल्हास्तरावरुन BMMU, संघ तसेच स्वयंमसहाय्यता गटांना निधी वितरण | मुख्य कार्यकारी अधिकारी संबंधित जि.प. | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान |
| ब) प्रशासकीय | | | |
| १. | राज्य, जिल्हा, तालुका व क्लस्टर स्तरावरील शैक्षणिक, तांत्रिक, प्रशासकीय, व्यवस्थापकीय, प्रशिक्षण व इतर सर्व प्रकारच्या पद निर्मितीस मान्यता प्रदान करणे (संस्थेची उपविधी कलम १५-इ) | राज्यस्तरीय नियंत्रण समिती | राज्यस्तरीय सर्वसाधारण अभिकरण समिती |
| २. | सेवा शर्तीस मान्यता देणे- | राज्यस्तरीय कार्यकारी समिती | राज्यस्तरीय नियंत्रण समिती |

राज्यस्तरावर संपादणूक व खर्च करण्याच्या मर्यादा

| अ.क्र. | विषयाचा तपशील | मुख्य कार्यकारी अधिकारी (MSRLM) | मिशन संचालक (MSRLM) | राज्यस्तरीय कार्यकारी समिती |
|---|---|---|---|---|
| १ | सेवा, कामे व साहित्य संपादणूकीस प्रशासकीय मान्यता प्रदान करणे | रु. ५० लक्ष पर्यंत | रु. १ कोटी पर्यंत | पूर्ण अधिकार |
| २ | खर्च करण्यास मान्यता | रु. २५ लक्ष पर्यंत | रु. १ कोटी पर्यंत | पूर्ण अधिकार |

## ल्हास्तरावर संपादणूक व खर्च करण्याच्या मर्यादा

| अ.क्र. | विषयाचा तपशील | जिल्हा अभियान संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | जिल्हास्तरीय कार्यकारी समिती (MSRLM) |
|---|---|---|---|
| १ | सेवा, कामे व साहित्य संपादणूकीस प्रशासकीय मान्यता प्रदान करणे | रु. २० लक्ष पर्यंत | पूर्ण अधिकार |
| २ | खर्च करण्यास मान्यता | रु. २० लक्ष पर्यंत | पूर्ण अधिकार |

उपरोक्तपणे अधिकारांचे प्रत्यायोजन करण्यात येत असून सदर मर्यादांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

२) सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१२१२१५१२०६२२११२० असा आहे.

३) महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

( एस.एस.संधू)
प्रधान सचिव
(ग्रामविकास विभाग) महाराष्ट्र शासन

त :

१) मा. राज्यपाल महोदयांचे सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
४) मा. मंत्री ग्रामविकास, कृषि, पशुसंवर्धन, जलसंधारण, कामगार, शिक्षण, उद्योग, महिला व बालविकास,आरोग्य,वित्त, नियोजन,सामाजिक न्याय व आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
५) मा. राज्यमंत्री, ग्रामविकास यांचे खाजगी सचिव
६) मा. मुख्य सचिव यांचे सहसचिव
७) प्रधान सचिव, नियोजन/वित्त/सामाजिक न्याय/अदिवासी विकास/महिला व बाल कल्याण/ सहकार/ कृषि व पशुसंवर्धन/ उद्योग/ उर्जा व कामगार/ आरोग्य/ शालेय शिक्षण/ उच्च व तंत्र शिक्षण/रोजगार व स्वंयरोजगार, मंत्रालय मुंबई
८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.
९) महालेखापाल (लेखा परिक्षण), मुंबई/ नागपूर
१०) विभागीय आयुक्त, (सर्व)
११) जिल्हाधिकारी, ठाणे, रत्नागिरी, नंदुरबार, सोलापूर, उस्मानाबाद, जालना, वर्धा, गोंदिया, गडचिरोली, यवतमाळ
१२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, ठाणे, रत्नागिरी, नंदुरबार, सोलापूर, उस्मानाबाद, जालना, वर्धा, गोंदिया, गडचिरोली, यवतमाळ
१३) उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, ठाणे, रत्नागिरी, नंदुरबार, सोलापूर, उस्मानाबाद, जालना, वर्धा, गोंदिया, गडचिरोली, यवतमाळ
१४) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, ठाणे, रत्नागिरी, नंदुरबार, सोलापूर, उस्मानाबाद, जालना, वर्धा, गोंदिया, गडचिरोली, यवतमाळ
१५) जिल्हा प्रकल्प व्यवस्थापक, ठाणे, रत्नागिरी, नंदुरबार, सोलापूर, उस्मानाबाद, जालना, वर्धा, गोंदिया, गडचिरोली, यवतमाळ
१६) निवड नस्ती

G.R शासन निर्णय

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या अमंलबजावणीसाठी SLBC अंतर्गत राज्य, जिल्हा व गट स्तरीय समित्यांची स्थापना.

महाराष्ट्र शासन

ग्रामविकास व जलसंधारण विभाग

शासन निर्णय क्रमांक : एसएलबीसी २०१२/प्र.क्र.२०४/यो-३,

२५, बांधकामभवन, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई – ४०० ००१, दिनांक १६ जानेवारी, २०१३.

वाचा :१) शासन निर्णय क्रमांक -एनआरएलएम -२०११/प्र. क्र. १९६/यो -३, दि. १८ जुलै, २०११.
२) शासन निर्णय क्रमांक : एसएलबीसी २०१२/प्र.क्र.२०४/यो-३, दि. २० नोव्हेंबर, २०१२.

**निर्णय :-**

समक्रमांक दिनांक २० नोव्हेंबर, २०१२ चा शासन निर्णय अधिक्रमित करुन पुढील शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे :-

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाअंतर्गत स्वयंसहाय्यता गटांना पतपुरवठा करण्याकरिता व बँकेच्या समन्वयाने अभियानाची अंमलबजावणी करण्याकरीता SLBC अंतर्गत खालील समित्या गठीत करण्यात येत आहे:-

**अ) राज्यस्तरीय बँक सुकाणू समिती :-**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियांनातर्गत स्वयंसहाय्यता गट व बँक जोडणी संदर्भात राज्यस्तरीय धोरण ठरविणे व अभियानाची अंमलबजावणी करणारे अधिकारी व बँक यांच्यातील अडचणीचे निराकरण करण्यासाठी राज्यस्तरावर मा. मंत्री (ग्रामविकास) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय बँक सुकाणू समितीची स्थापना करण्यात येत आहे.

**राज्यस्तरीय बँक सुकाणू समितीची रचना :-**

| | |
|---|---|
| १. मा.मंत्री (ग्रामविकास) | अध्यक्ष |
| २. मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) | सहअध्यक्ष |
| ३. प्रधान सचिव (ग्रामविकास) | सदस्य |
| ४. उपसचिव, (योजना), ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई | सदस्य |
| ५. महाव्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र व संयोजक राज्यस्तरीय बँकर्स समिती, पुणे | सदस्य |
| ६. सीजीएम, नाबार्ड, बांद्रा (पूर्व), मुंबई. | सदस्य |
| ७. महाव्यवस्थापक, स्टेट बँक ऑफ इंडिया | सदस्य |
| ८. महाव्यवस्थापक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया | सदस्य |
| ९. महाव्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया | सदस्य |
| १०.राज्यसमन्वयक, आरसेटी | सदस्य |
| ११.रिझर्व्ह बँकेचे प्रतिनिधी, | सदस्य |
| १२.प्रादेशिक ग्रामीण बँक (RRB) चे प्रतिनिधी | सदस्य |
| १३. दोन विविध बँकांचे प्रतिनिधी | निमंत्रित |
| १४. दोन प्रकल्प संचालक /मुख्य कार्यकारी अधिकारी | निमंत्रित |
| १५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान | सदस्य सचिव |

GR file

**राज्यस्तरीय बँक सुकाणू समितीची कार्ये :-**

१. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाअंतर्गत स्वयंसहाय्यता गटांना जास्तीत जास्त पतपुरवठा व्हावा तसेच बँकांसंबंधी अडचणीचे निराकरण व्हावे याकरीता नियोजन, समन्वय, सनियंत्रण आणि आढावा घेणे.